असा. क्र. ५४ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, नोव्हेंबर २३, २००६/अग्रहायण २, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५.**—महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००६ यामध्ये सुधारणा करण्यासाठी अध्यादेश . . . . . . . . | ३७६-३७९ |

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ नोव्हेंबर २००६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XV OF 2006.**

AN ORDINANCE TO AMEND THE MAHARASHTRA CONTINGENCY FUND (AMENDMENT) ORDINANCE, 2006.

**सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५.**

**महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००६ यामध्ये सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

२००६ चा महा. अध्या. ८. **आणि ज्याअर्थी,** यात या पुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००६ यात सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे ज्यामुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ याच्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, २००६ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००६ याच्या कलम २ मध्ये " रुपये आठशे कोटी इतक्या रकमेचा " या मजकुराऐवजी " रुपये बाराशे कोटी इतक्या रकमेचा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. २००६ चा महा. अध्या. ८.

## निवेदन

महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम (१९५६ चा मुंबई ४६) या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या व ठेवण्यात आलेल्या, राज्याच्या आकस्मिकता निधीची मर्यादा रुपये १५० कोटी एवढी आहे. दिनांक १८ ऑगस्ट २००६ रोजी प्रख्यापित केलेल्या, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००६ (२००६ चा महा. अध्या. ८) द्वारे तात्पुरता उपाय म्हणून, उक्त निधीची मर्यादा रुपये १५० कोटींहून रुपये ८०० कोटी इतकी वाढविण्यात आली आहे.

२. राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई देण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तथापि, बाधित झालेल्या लोकांना वाटप करण्यासाठी अजूनही जवळजवळ रुपये ३६४.६१ कोटी एवढ्या निधीची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे, माननीय पंतप्रधानांनी नागपूर भेटी दरम्यान जाहीर केल्याप्रमाणे, लहान पाटबंधारे प्रकल्पांसाठी, जलसंपदा विभागाला रुपये ८० कोटी एवढा निधी उपलब्ध करून देणे आवश्यक होते. यापैकी, रुपये २२.१९ कोटी एवढा निधी देण्यात आला आहे आणि रुपये ५७.८१ कोटी एवढा निधी अजून द्यावयाचा आहे. विदर्भ पॅकेज अन्वये, बाधित शेतकऱ्यांना व्याजात सूट देण्याकरिता रुपये ४८.११ कोटी एवढे सहाय्य देण्यासाठी तरतूद करावयाची आहे. याशिवाय तातडीच्या व अकल्पित स्वरूपाच्या खर्चाच्या अन्य काही बाबींवरही खर्च करावा लागेल. या बाबींवरचा खर्च भागवण्यासाठी ४०० कोटी रुपये लागतील असा अंदाज आहे. खर्चाच्या या बाबी "नवीन सेवा" असतील आणि म्हणून त्या, राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. राज्य विधानमंडळाचे आगामी अधिवेशन दिनांक ४ डिसेंबर २००६ रोजी सुरू करण्याचे ठरले आहे. उपरोल्लिखित योजनांकरिता निधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेले आदेश मात्र, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत पूरक मागण्या व विनियोजन विधेयक संमत करून त्याद्वारे, या "नवीन सेवांवरील" खर्च राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देऊन व ते विधेयक राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून प्रसिद्ध झाल्यानंतरच देता येतील. या बाबींवरील खर्च हा तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे तो आकस्मिकता निधीमधून आगाऊ रकमा काढूनच भागवावा लागेल.

३. आकस्मिकता निधीची सध्याची वाढलेली मर्यादा ही फक्त रुपये ८०० कोटींची आहे. त्यापैकी, निकडीच्या स्वरूपाच्या विविध बाबींवरील खर्च भागविल्यानंतर, आकस्मिकता निधीमध्ये सध्या अदमासे रुपये ५७.७२ कोटी एवढी रक्कम शिल्लक आहे. उपरोल्लिखित बाबींवरील खर्च आणि आकस्मिकता

निधीमधून भागवणे आवश्यक असलेला, अन्य अकल्पित आणि तातडीच्या बाबींवरील खर्च भागविण्याकरिता ही शिल्लक अपुरी आहे. म्हणून, उपरोक्त खर्च भागविण्याकरिता, आकस्मिकता निधीच्या मर्यादेत तात्पुरती वाढ करून तो निधी रुपये ८०० कोटीवरून रुपये १२०० कोटी इतका करणे इष्ट वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००६ (सन २००६ चा महा. अध्या. ८) या मध्ये सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १३ नोव्हेंबर २००६.

**एस. एम. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुबोध कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई